**Research Paper**

# डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे वृत्तपत्रातील योगदान

**डॉ. सुरेश एन काळे**
इतिहास विभाग प्रमुख, एच.बी.टी. कला व वाणिज्य
महाविद्यालय, न्यु सुभेदार, नागपूर.

**सारांश**

मानवी जीवन विकासाच्या इतिहासाच्या प्रदीर्घ प्रक्रियेत वृत्तपत्राचे स्थान महत्वपूर्ण आहे. व्यक्ती, समाज आणि राष्ट्राच्या उभारणीत वृत्तपत्रांची महत्त्वाची भूमिका आहे. सतराव्या, अठराव्या आणि एकोणीसाव्या शतकात इंग्लंड, फ्रान्स, इटली, जर्मनी व अन्य पाश्‍चिमात्य आणि भारत यामध्ये ज्या सामाजिक, सांस्कृतिक आणि राजकीय चळवळी किंवा परिवर्तन झाली त्यात वृत्तपत्रांचे योगदान मोलाचे आहे. व्यक्तीच्या आणि राष्ट्राच्या संपूर्ण जीवनात वृत्तपत्राला महत्त्वपूर्ण स्थान आहे. कारण जागतिक, राष्ट्रीय व स्थानिक घडामोडी समाजापर्यंत नेणारे वृत्तपत्र एक, प्रमुख प्रभावी साधन आहे.

वृत्तपत्रांच्या माध्यमाने जनता आपले विचार, आकांक्षा सरकारपर्यंत पोहोचविणे आणि वृत्तपत्रांच्या द्वारेच सरकारी घटनांची, विचारांची व उपक्रमांची माहिती जनतेला मिळते. मानवी जीवन आणि वृत्तपत्रे परस्परांची अंगे बनली आहेत. एका नाण्याच्या दोन बाजू याप्रमाणे त्यांचे स्वरुप आहे.

२३ जून १७५७ रोजी इंग्रजी सत्येचे बीजा रोपन झाले आणि २२ ऑक्टोंबर १७६४ रोजी इंग्रजी सत्येचे वृक्षात रुपांतर झाले. ब्रिटिश इस्ट इंडिया कंपनीला भारतात शासकीय व्यवहार करावा लागल्याने तिच्या विरुद्ध असंतोष निर्माण होऊ लागला व तो प्रगट करण्याची इच्छा प्रबळ होऊ लागली. या इच्छेतूनच भारतात वृत्तपत्रांचा जन्म झाला. या कार्यात सुरुवातीला पाश्चात्यांचा पुढाकार राहीला व पहिली जवळजवळ चाळीस वर्षे तरी केवळ इंग्रजी वृत्तपत्रेच अस्तित्वात होती.

भारतात पहिले वृत्तपत्र २९ जानेवारी १७८० रोजी 'बंगाल गॅझेट' किंवा 'कलकत्ता जनरल ॲडव्हर्टायझर' (Culcutta General Advertiser) या नावाने जेम्स ऑगस्ट हिकी याने हे इंग्रजी साप्ताहीक सुरु केले.[१] 'हिकीज गॅझेट' म्हणूनच ते प्रसिद्ध आहे. पुढे फेब्रुवारी १७८५ मध्ये 'बेंगाल जर्नल' निघाले. त्याच वर्षी 'ओरीएन्टल मॅगझीन' अथवा 'कलकत्ता ॲम्युझमेंट' मासिक निघाले. इ.स. १७८६ ला 'कलकत्ता क्रांनिकल' प्रकाशित झाले. हिक्कीच्या वृत्तपत्रानंतर सहा वर्षात पाच वृत्तपत्र निघाले. सरकारी मुद्रक रिचर्ड जॉन्स्टन यांनी १२ ऑक्टोबंर १७८५ ला 'मद्रास कुरीयर' हे वृत्तपत्र मद्रासमध्ये सुरु केले. पुढे जानेवारी १७९५ ला 'विकली मद्रास गॅझेट' हे वृत्तपत्र निघाले. त्याचवर्षी हम्फ्रीज याने 'इंडिया हेरॉल्ड' हे वृत्तपत्र मद्रासला निघाले. कलकत्ता, मद्रास नंतर मुंबईत 'बॉम्बे हेरॉल्ड' हे पहिले वृत्तपत्र निघाले. या वृत्तपत्रानंतर इ.स.१७९० मध्ये ल्युक ॲशबर्नर याने, 'बॉम्बे कुरीयर' हे वृत्तपत्र सुरु केले. या वृत्तपत्रात गुजराती व मराठी (मोडी लीपीत) जाहिराती प्रसिद्ध होत असत. इ.स. १७९१ मध्ये 'बॉम्बे गॅझेट' हे साप्ताहीक सुरु झाले. मुंबईत मराठीत पहिले वृत्तपत्र 'दर्पण' ६ जानेवारी १८३२ रोजी बाळशास्त्री जांभेकरांनी सुरु केले. विरेश्वर छत्रे यांनी मुंबईत ७ फेब्रुवारी १८४२ ला 'ज्ञानसिंधू' हे साप्ताहीक सुरु केले. 'ज्ञानप्रकास' हे पुण्यात १२ फेब्रुवारी १८४९ रोजी प्रसिद्ध झाले. महादेव गोविंद रानडे व रामकृष्ण गोपाळ भांडारकर यांनी 'इंदुप्रकाश' हे साप्ताहीक २ जानेवारी १८६२ रोजी सुरु झाले. 'मराठा' वृत्तपत्राचा पहिला अंक २ जानेवारी १८८९ ला तर 'केसरी' वृत्तपत्राचा अंक ४ जानेवारी १८८१ ला प्रकाशित झाला. आगरकरांनी 'सुधारक' हे वृत्तपत्र १५ ऑक्टोंबर १८८८ रोजी पहिला अंक प्रकाशित केला.[२]

अशाप्रकारे स्वातंत्र्यपूर्व काळातील महाराष्ट्रातील वृत्तपत्राचा जन्म समाजसुधारणा, हिंदू समाजरचना व हिंदू समाजव्यवस्था यात परिवर्तन करण्याच्या उद्देश्याने झालेला होता. पारंपारिक असे जे लाज्य होते त्याचा त्याग करायला म्हणून बदलत्या काळाला अनुरुप ती मुलव्यवस्था निर्माण करण्याचा प्रयत्न या वृत्तपत्रांनी केला. बहुजन समाज व दलित समाजाची विषमतावादी धार्मिक दास्यातून व सामाजिक गुलामगिरीतून मुक्ती करण्यासाठी महात्मा ज्योतिबा फुले यांनी सप्टेंबर १८७३ ला 'सत्यशोधक समाज' ची स्थापना केली. सत्याशोधक समाजाचे प्रमुख सहकारी कृष्णराव मालेकर यांनी

महात्मा फुल्यांची प्रेरणा घेऊन 'दीनबंधू' चा पहिला अंक १ जानेवारी १८७७ रोजी प्रकाशित झाला. बालचंद रा. कोठारी यांनी पुण्यात १९ जुलै १९१७ ला 'जागरुक' हे वृत्तपत्र प्रकाशित केले तर २५ ऑक्टोंबर १९१७ रोजी 'जागृती' हे वृत्तपत्र भगवत बळवंत पालेकर यांनी संपादित केले.[३]

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी राजकीय व सामाजिक सुधारणा या वादात न पडता समग्र सुधारणांना प्राध्यान्य दिले आणि स्वत:चा समन्वयात्मक तिसरा प्रवाह सुरु केला ज्यामुळे हिंदू समाजात संपूर्ण आणि आमुलाग्र परिवर्तन होण्यास परिवर्तनास एक निश्चित दिशा व गती देण्याकरीता ३१ जानेवारी १९२० रोजी 'मूकनायक' या वृत्तपत्राचे प्रकाशन केले. मूकनायक पाक्षिक वृत्तपत्राचा जन्म हिंदूस्थानातील अस्पृश्यांच्या मूक्तिसंग्रामाला नवजीवन देणारी संजीवनी होती. संपादक म्हणून पांडूरंग नंदुराम भटकर यांची नियूक्ती डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी केली.[४]

'मूकनायक' वृत्तपत्रात डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी एकूण चौदा लेख लिहिले. पहिल्या अंकाच्या मनोगतात, त्यांनी आपली भूमिका विषद केली. आमच्या या बहिष्कृत लोकांवर होत असलेल्या व पुढे होणाऱ्या अन्यायावर उपाययोजना सुचविण्यात तसेच त्यांची भावी उन्नती व तिचे मार्ग यांच्या खऱ्या स्वरुपाची चर्चा होण्यास वर्तमानपत्रासारखी अन्य भूमीच नाही. परंतू मुंबइ इलाख्यात निघत असलेल्या वृत्तपत्रांकडे पाहिले असता असे दिसून येईल की, त्यातील बरीचशी पत्रे विशिष्ट अशा जातीचे हितसंबंध जपणारी आहेत. इतर जातींच्या हिताची पर्वा त्यांना नसते. अशा वृत्तकारांना आमचा एवढाच इशारा आहे की, कोणतीही एखादी जात अवनत झाली तर तिच्या अवनतीचा डाग इतर जातीला बसल्याशिवाय राहणार नाही. समाज ही नौकाच आहे. ज्याप्रमाणे बोटीत बसून प्रवास करणाऱ्या उतारुने जाणूनबुजून इतरांचे नुकसान करावे म्हणून म्हणा किंवा आपल्या विनाशक स्वभावामूळे म्हणा जर का इतरांच्या मुळे बोटीला खोल पाण्यात छिद्र पाडले तर सर्वांना बोटीसहीत जलसमाधी ही घ्यावीच लागणार आहे. त्याचप्रमाणे एका जातीचे नुकसान केल्याने, अप्रत्यक्ष नुकसान करणाऱ्या जातीचेही नुकसान होणार यात बिलकूल शंका नाही. म्हणूनच स्वहितसाधू वृत्तपत्रांनी इतरांचे नुकसान करुन आपले हित करावयाचे पढतमुर्खाचे लक्षण शिकू नये.[५]

डॉ. आंबेडकरांना सामाजिक समता प्रस्थापित करावयाची होती त्यामुळे या देशातील जातिव्यवस्थेची पाळेमूळे खणून काढली पाहिजे असा त्यांचा आग्रह होता. बहिष्कृत समाजाला आत्मस्थितीचे भान आणून देण्यासाठी ज्ञानाचे अंजन घातले पाहिजे असे त्यांचे मत होते. 'स्वराज्याची सर सुराज्याला नाही' या लेखात ते म्हणतात सुधारलेल्या राष्ट्रातील राज्यपद्धतीचा कल जितका शासनाकडे असतो तितकाच संस्कृतीकडे असतो. त्यापेक्षा प्रजेची उन्नती अधिक कशी होईल याचे मार्ग आखणे, तिची साधने सर्वांना सारखी उपलब्ध करुन देणे हा राज्य करण्याचा दुसरा हेतू शासनाइतका किंबहूना अधिक महत्त्वाचा होऊन बसला आहे. स्वराज्य कोणाचे व ते कशासाठी हे कळल्याखेरीज या तत्वाची री आम्ही ओढणार नाही. इंग्रजी अंमल जाऊन सवर्णाचे राज्य तेवढे येणारे असेल तर बहिष्कृतांनी काय पुन: नव्या गुलामगिरीत रहावे काय? अशाप्रकारे अगदी नेमक्या प्रश्नावर त्यांनी बोट ठेवले आहे. स्वराज्य दयाल तर असे स्वराज्य दयाकी ज्यात आमचेही राज्य असेल. भारतातील वृत्तपत्रे लोक शिक्षणाच्या उद्दात हेतूने प्रेरीत झालेली होती. त्यामुळे वाचकांना शिक्षित करण्यावर त्याचा भर होता. डॉ. आंबेडकरांचे कार्य तर फार कठीण होते. शिक्षणाचा प्रसार आपल्या समाजात जवळजवळ झालेला नाही. तो हळुहळू झाला तर त्यातून नवा वाचक वर्ग आपल्याला मिळेल अशी आशा त्यांना होती. डॉ. बाबासाहेब शिक्षणासाठी विलायतेला गेल्यामूळे मुकनायकाच्या संगोपनात व्यवस्थाकीय मंडळींनी फारसा रस घेतला नाही. त्यातच इ.स. १९२३ साली 'मूकनायक' बंद झाले.[६]

मूकनायक स्मृतिविशेष झाले या घटनेने खचून न जाता हिंदूस्थानातील नव्या परिस्थितीची आव्हाने स्वीकारुन अस्पृश्यांच्या चळवळीस नवे रुप, नवी दिशा आणि नवा आकार देण्याच्या जिद्दिने डॉ. आंबेडकरांनी संघटन आणि चळवळीची माध्यमे शोधली. ही चळवळ प्रभावी राबविण्याकरिता ३ एप्रिल १९२७ रोजी 'बहिष्कृत भारत' वृत्तपत्र सुरु केले. या वृत्तपत्राचे संपादक स्वत: डॉ. आंबेडकर होते. बहिष्कृत भारत्याच्या पहिल्या अंकातील पहिल्याच अग्रलेखातून उद्दिष्टयांची मांडणी केलेली आहे. बहिष्कृतश भारत जेमतेम दोन वर्षेपर्यंत चालले. इ.स. १९२७ ते इ.स. १९२९ या कालावधीत एकूण ३४ अंक प्रकाशित झाले. त्यातून ३१ लेख वाचकांच्या समोर आले. आजकालचे प्रश्न या सदरात पहिल्या वर्षातील पंधरा अंकातून ७० फूट लेख आले. दुसऱ्या वर्षात प्रासंगिक विचार या सदराखाली ७५ स्फूट लेख आहेत. पहिल्या वर्षातील बहुसंख्य अग्रलेखांचे, स्फुट लेखाचे केंद्र महाड हेच आहे.[७]

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी बहिष्कृत भारत हे वृत्तपत्र बंद झाल्यानंतर २४ नोव्हेंबर १९३० रोजी 'जनता' या वृत्तपत्राचा प्रथम अंक प्रकाशित केला. 'जनता' हे वृत्तपत्र दीर्घकाळ प्रकाशित होत राहिले, म्हणजे २४ नोव्हेंबर १९३० ते ४ फेब्रुवारी १९५६ रोजी 'जनता' चे 'प्रबुद्ध भारत' यात रुपांतर होईपर्यंत चालले होते. इ.स. १९३० ते १९५० पर्यंतचा काळ आणि त्यातील ऐतिहासिक महत्वाच्या घटनांचा साक्षीदार म्हणून 'जनता' पत्राच्या संचिताकडे पाहिले पाहिजे. जनता पत्रामुळे डॉ. बाबासाहेबांच्या चळीवळीच्या सामर्थ्याची जाणीव होते. अन्यथा प्रस्थापित पत्रांनी या चळवळीची फारशी दखल घेतली नसती. 'गुलामाला तू गुलाम आहेस असे सांगा म्हणजे तो बंड करुन उठेल!' हे ब्रीदवाक्य 'जनता' वृत्तपत्राच्या शिर्षक भागी लिहिलेले असे

त्यामुळे अस्पृश्यांना बंडखोरीचे आणि अन्याया विरुद्ध संघर्षाचे तत्वज्ञान देण्याच्या उद्दिष्टानेच 'जनता' वृत्तपत्राची निर्मिती झाली होती. ४ फेब्रुवारी १९५६ रोजी 'जनता' चे 'प्रबुद्ध भारत' असे नामांतर करण्यात आले. ६ डिसेंबर १९५६ रोजी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे निर्वाण झाल्यानंतर 'प्रबुद्ध भारत' चे संपादक म्हणून यशवंतराव आंबेडकर, मुकूंदराव आंबेडकर, दा.ता. रुपवते, शंकरराव खरात आणि भा.र.कद्रेकर यांनी अनुक्रमे जबाबदारी सांभाळली. ३ ऑक्टोंबर १९५७ ला अखिल भारतीय रिपब्लीकन पक्षाची स्थापना झाल्यानंतर 'प्रबुद्ध भारत' रिपब्लीकन पक्षाचे मुखपत्र बनले. इ.स. १९६१ साली हे साप्ताहीक बंद पडले. संपादक मंडळात असलेल्या राजकीय नेत्यांमध्ये निर्माण झालेला वेबनाव आणि पडलेली शकले याचा प्रत्यक्षाप्रत्यक्ष परिणाम 'प्रबुद्ध भारत' वर होऊन ते बंद पडले.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी गोलमेज परिषदेवर टाकलेला प्रभाव, महात्मा गांधीजींशी केलेला वैचारिक संघर्ष, यातून उद्‌भवलेला पूणे करार, अस्पृश्य वर्गाला मिळालेले हक्क, धर्मान्तराची घोषणा, शेतमजूर, कामगारांसाठी केलेल कार्य, घटनेची निर्मिती, इत्यादी किती तरी घटनांचा वृत्तांत व डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची विचार संपदा 'जनता' वृत्तपत्राच्या अंकातून लोकांपर्यंत पोहचत होती. इ.स. १९३६ ते इ.स. १९४२ पर्यंत 'इंडिपेन्डट लेबर पार्टी' या पक्षाचे कार्य व त्यानंतर 'शेडयूल कास्ट फेडरेशन' या पक्षाचे कार्य 'जनता' वृत्तपत्रातून लोकांना वाचायला मिळत होते.

डॉ. गंगाधर पानतावणे म्हणतात त्याचप्रमाणे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची वृत्तपत्रे धूमकेतूसारखी होती. ती अल्पकाळ जगली पण प्रखर प्रकाश होऊनच डॉ. बाबासाहेब आंबेडकर अर्थशास्त्रज्ञ होते. परंतू त्यांना आपल्या वृत्तपत्रांचे अर्थशास्त्र कधीच जुळवता आला नाही. वृत्तपत्र चालविण्यासाठी त्यांच्याकडे कधीच अर्थ ओघ नव्हता. वृत्तपत्राची तांत्रिक बाजूसुद्धा भक्कम नव्हती. अन्य वृत्तपत्रातील संपादकीय विभागे किंवा अन्य विभागासारखी श्रीमंती नव्हती. मात्र चोवीस चोवीस रकाने लिहिणारे डॉ. बाबासाहेबांचे हात दलितांच्या नवसृष्टीचे रचनाकार होते.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या झुंजार व्यक्तीमत्वाचे दर्शन हा उपरोक्त वृत्तपत्राचा एक विलोभनीय विशेष होय. मूलभूत, मर्मभेदी, आत्मप्रत्ययी, बुद्धी प्रमाण्य वादी, चिंतनशील, चिकीत्सक, समाजातील रोगट प्रवृत्तीचे नाहीसी करुन मानवी समाजाला इहनिष्ढेचा नवा प्रत्यय देणारे क्रांतिकारक असे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे लेखन अनेक अंकातून प्रकाशित झाले आहे. त्यांचे वृत्तपत्रातील लेखन भविष्यातील पिढयांना मार्गदर्शक व प्रेरणास्त्रोत आहे.

**संदर्भ सुची**

१) लेले रा.के. मराठी वृत्तपत्राचा इतिहास, कॉन्टिनेंटल प्रकाशन, पूणे दुत्तिय आवृत्ती, २००४ पृ.क्र.२३.
२) कित्ता पृ.क्र. २६,२७.
३) रायकर सीताराम, संपा. कृष्णराव भालेराव, समग्र वाङमय, श्रीविद्या प्रकाशन, पूणे—३०पृ.क्र.१२.
४) गणवीर रत्नाकर, संपा. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे बहिष्कृत भारतातील अग्रलेख, रत्नमित्रा प्रकाशन, नागपूर दुत्तिय आवृत्ती १९८५, पृ.क्र. १८.
५) मूकनायक : ३१ जानेवारी १९२०.
६) पानतावणे गंगाधर, लोकपत्रकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर, प्रचार प्रकाशन, कोल्हापूर प्रथम आवृत्ती १९८७, पृ.क्र.६१.
७) फडके भालचंद्र, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, श्रीविद्या प्रकाशन, पूणे, प्रथमावृत्ती १९८५, पृ.क्र.१०८.